मा. सर्वोच्च न्यायालयाने भटक्या श्वानांच्या संदर्भात वेळोवेळी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने राज्यातील सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यवाही करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास व पंचायत राज विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः- झेडपीए-२०२५/प्र.क्र.७८ (Comp.No.१४४०१७१)/पंरा-१
बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,फोर्ट, मुंबई-४००००१.
**दिनांक: २७ नोव्हेंबर,२०२५.**

**वाचा:-**
१) प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम, २०२३, दिनांक १६/०३/२०२३.
२) मा.सर्वोच्च न्यायालयात सु-मोटो रिट याचिका क्र.५/२०२५ याचिकेमध्ये वेळोवेळी दिलेले निर्देश.
३) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अ.शा.पत्र, दिनांक १३ नोव्हेंबर, २०२५

**<u>प्रस्तावना:-</u>**

प्राणी जन्म नियंत्रण (Animal Birth Control) नियम, २०२३ सर्व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लागू करण्यात आले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे CITY HOUNDED BY STRAYS, KIDS PAY PRICE याबाबत सु-मोटो रिट याचिका क्र.५/२०२५ दाखल असून या प्रकरणी दिनांक ०३/११/२०२५ रोजी मा. सर्वोच्च न्यायालय येथे मा. मुख्य सचिव स्वतः उपस्थित होते. मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निर्देश पाहता मा. सर्वोच्च न्यायालयाने सदर बाब अतिशय गांभीर्याने घेतलेली आहे, असे स्पष्ट होते. भटक्या जनावरांमुळे मानवाच्या दैनंदिन जीवनात होणारा उपद्रव तसेच मानव-श्वान संघर्ष टाळण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक झाले आहे. ही बाब पाहता सु-मोटो रिट याचिका क्र.५/२०२५ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना भटक्या श्वानांच्या संदर्भात कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन परिपत्रक :</u>**

मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल सु-मोटो याचिका क्र.५/२०२५ च्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदा/पंचायत समिती/ग्रामपंचायती यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

१. **भटक्या श्वानांना पकडून निर्बीजीकरण, लसीकरण व जंतनिर्मुलन करणे** - राज्यातील सर्व जिल्हा परिषदा/पंचायत समिती/ग्रामपंचायती क्षेत्रातील भटक्या श्वानांना पकडून त्यांचे निर्बीजीकरण, लसीकरण व जंतनिर्मुलन करावे.

२. **भटक्या श्वानांकरिता आश्रय/निवाऱ्यांची सोय** - सर्व जिल्हा परिषदा/पंचायत समिती/ग्रामपंचायतींनी त्यांच्या क्षेत्रातील भटक्या श्वानांना पकडून त्यासाठी आश्रय/निवाऱ्यांची सोय करावी.

३. **भटक्या श्वानांना खाण्यासाठी जागा निश्चित करणे** - सर्व जिल्हा परिषदा/पंचायत समिती/ग्रामपंचायती क्षेत्रातील भटक्या श्वानांकरिता खाण्यासाठी जागा निश्चित करण्यात याव्यात व त्याच जागेवर भटक्या श्वानांना खायला देण्यात येत आहे, याची खातरजमा करावी. इतर मोकळ्या ठिकाणी खायला देण्याऱ्याविरुध्द योग्य ती प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात यावी.

४. **रुग्णालयांनी नेहमीच अँटी रेबीज लस आणि इम्युनोग्लोबुलिनचा अनिवार्य साठा ठेवावा** - राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या कार्यक्षेत्रात प्राथमिक आरोग्य केंद्रे उभारण्यात आलेली आहेत. तसेच राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या अधिनस्त असणाऱ्या रुग्णालयांनी नेहमीच अँटी-रेबीज लस आणि इम्युनोग्लोबुलिनचा अनिवार्य साठा ठेवावा, तसेच साठा उपलब्धतेसाठी अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय यांचेशी समन्वय ठेवावा.

५. **समन्वय अधिकाऱ्यांची (नोडल अधिकारी) नियुक्ती** - भटक्या श्वानांच्या संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदा/पंचायत समिती/ग्रामपंचायती यांच्यामध्ये समन्वय साधण्याकरिता संचालक,पंचायत राज महाराष्ट्र राज्य, पुणे यांची याव्दारे समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

तसेच याबाबतीत ग्रामपंचायती क्षेत्रासाठी ग्रामपंचायत अधिकारी, पंचायत समिती क्षेत्रासाठी गट विकास अधिकारी, जिल्हा परिषद क्षेत्रासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि विभागीय महसूल क्षेत्रासाठी **अपर आयुक्त (विकास)** यांची नोडल ऑफिसर म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे.

६. **मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार करावयाची कार्यवाही** - ग्रामीण भागातील शैक्षणिक संस्था, रुग्णालये (सार्वजनिक व खाजगी), क्रीडा संकुल, बस स्टॅन्ड/डेपो, रेल्वे स्टेशन व इतर सार्वजनिक ठिकाणी/परिसरात आढळण्याऱ्या भटक्या श्वानांना ताबडतोब पकडून त्यांचे निर्बीजीकरण आणि लसीकरणानंतर नियुक्त केलेल्या निवाऱ्यांमध्ये हलविण्याची जबाबदारी तसेच अशा भटक्या श्वानांना पुन्हा त्याच ठिकाणी सोडले जाणार नाही, याची दक्षता घ्यावी. यासाठी ग्रामपंचायत व पंचायत समिती स्तरावर पशुधन पर्यवेक्षक, पशुधन विकास अधिकारी हे गट विकास अधिकारी तथा नोडल अधिकाऱ्यांना सहकार्य करतील. गट विकास अधिकाऱ्यांमार्फत ग्रामपंचायत स्तरावर होणाऱ्या अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेतला जाईल. तसेच जिल्हा स्तरावर उपायुक्त, पशुसंवर्धन हे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा नोडल अधिकारी यांना सहकार्य करतील. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) हे याबाबत वेळोवेळी कार्यवाहीचा आढावा घेवून मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अहवाल देतील. विभागीय स्तरावर अपर आयुक्त (विकास) हे उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांचा प्रतिमाह आढावा घेवून जिल्हा स्तरावरील कार्यवाहीचे सनियंत्रण करतील. अपर आयुक्त (विकास) हे विभाग स्तरावरील आणि उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) हे ग्रामपंचायत स्तरावरील कार्यवाहीचा मासिक अहवाल संचालक पंचायत राज, महाराष्ट्र राज्य पुणे यांना सादर करतील. सदर अहवाल प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेपर्यंत सादर करणे बंधनकारक राहील.

२. मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल सु-मोटो याचिका क्र.५/२०२५ च्या संदर्भात उपरोक्त सूचनांचे सर्व जिल्हा परिषदा/पंचायत समिती/ग्रामपंचायती यांनी काटेकोरपणे पालन करावे. तसेच, या प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्या आदेशाचा अवमान होणार नाही, याची दक्षता

घ्यावी. मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे अनुपालन न झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना वैयक्तिकरित्या जबाबदार धरण्यात येईल.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर www.maharashtra.gov.in उपलब्ध असून, त्याचा सांकेतांक २०२५११२७१४५८०९५९२० असा आहे. हे शासन परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने प्रमाणित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KAVITA SHREEKANT POTDAR

Digitally signed by KAVITA SHREEKANT POTDAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=13D4FA70B85EFC3E2C0DAD34C94D0E3AAFAD88339C92C737ABFA65A2E2B75E8C, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=83C31497A208ABA89B68F5003B7D7015301BD7A1C6AD4D60C41A0E6E4856E74D, cn=KAVITA SHREEKANT POTDAR
Date: 2025.11.26 21:11:43 +05'30'

**( क.श्री. पोतदार )**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. मा. प्रबंधक, मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली.
२. मा. राज्यपाल यांचे सचिव,
३. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास विभाग) यांचे प्रधान सचिव
५. मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन विभाग) यांचे प्रधान सचिव
६. मा.विरोधी पक्ष नेते, विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ, विधान भवन, मुंबई
७. मा. मंत्री (ग्रामविकास व पंचायत राज) यांचे खाजगी सचिव,
८. मा. राज्यमंत्री (ग्रामविकास व पंचायत राज) यांचे खाजगी सचिव,
९. प्रधान सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, बांधकाम भवन, २५, मर्झबान पथ,फोर्ट, मुंबई.
१०. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य
११. सर्व जिल्हाधिकारी,
१२. महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य-१/२, मुंबई/नागपूर.
१३. अध्यक्ष, सर्व जिल्हा परिषद
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद,
१५. सर्व सह सचिव/उप सचिव, ग्रामविकास व पंचायत राज विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई.
१६. सभापती, सर्व पंचायत समिती
१७. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा,
१८. वित्त विभाग (व्यय-१५/विनियम/अर्थ-१७), मंत्रालय, मुंबई.
१९. सर्व ग्रामपंचायती
२०. निवडनस्ती पंरा-१ कार्यासन